

# ऱ्हुमॅटॉलॉजी - का आणि कोणत्या आजारासाठी ?

श्रीकांत वाघ *

*The author is an eminent rheumatologist practicing since last 24 yrs. He is trained in Rheumatology at EULAR (European League against Rheumatism) and G. S. Medical College, Mumbai.*

संधिवात हा समाजामध्ये फार मोठ्या प्रमाणात आढळून येतो. तीस टक्के लोकांना कोणत्या ना कोणत्या प्रकारचा संधिवात तसेच मान किंवा कंबरदुखीचा विकार होतो. सांधे आणि त्यांना जोडलेले स्नायू, लिगामेन्टस तसेच हाडे यांमुळे होणाऱ्या वेदनेला इंग्रजीत ऱ्हुमॅटिझम म्हणतात. त्यालाच आपण संधिवात म्हणतो. वात ही शरीरात हालचाली घडवून आणणारी शक्ति. सांध्यांच्या (त्यात मणकेही आलेच) हालचालीत कोणत्याही कारणाने बाधा आली की त्याला संधिवात म्हणतात. संधिवात हा आजार नसून तापासारखे लक्षण आहे. त्याची सुमारे शंभराहून अधिक कारणे आहेत. ऱ्हुमॅटॉलॉजीतले बरेचसे आजार हे स्वप्रतिकारशक्तीच्या दोषामुळे (Autoimmune) निर्माण होणारे असतात.

ऱ्हुमॅटॉलॉजी ही चिकित्साशास्त्राची (Medicine) सुपरस्पेशालिटी आहे. एम.डी. च्या साडेआठ वर्षांच्या कोर्सनंतर पुढे आणखी दोन वर्षे त्यासाठी प्रशिक्षण घ्यावे लागते. भारतात सध्या फक्त तीनेकशे ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट आहेत. म्हणजे सुमारे ३५ लाख लोकांसाठी फक्त एक. त्यातले बरेचसे मेट्रो शहरांमध्ये शासकीय किंवा इतर मोठ्या रुग्णालयांत काम करतात. आमवात (Rheumatoid Arthritis), लुपस, स्क्लेरोडर्मा, सोरियासिस संधिवात, मणक्यांचा संधिवात (Ankylosing Spondylitis), गाउट अशा बऱ्याच आजारांसाठी त्वचारोग तज्ज्ञ, नेत्र तज्ज्ञ, नेफ्रॉलॉजिस्ट, सर्जन अशा वेगवेगळ्या इतर तज्ज्ञांची मदत लागते. म्हणूनच जगभरातले ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट मोठमोठ्या हॉस्पिटलमध्ये इतर तज्ज्ञांसोबत काम करताना दिसतात. मोठे हॉस्पिटल नसलेल्या क्लिनिकमध्ये इतर तज्ज्ञांची मदत मिळू शकत नाही. प्रयोगशाळा आहे म्हणून अनावश्यक चाचण्या करण्याची प्रवृत्ती आढळते. तसेच त्यांचे रिपोर्टही विश्वासार्ह नसतात.

- सूजेचे संधिवात (आमवात) – यात ऱ्हुमॅटॉइड तसेच सोरियासिस, संग्रहणीजन्य (Colitis), रिॲक्टिव्ह सेप्टिक (जंतुबाधाजन्य) संधिवात आणि ॲन्किलोसिंग स्पॉन्डिलायटिस हे येतात. या सर्व आजारांमध्ये सांधे सुजलेले असतात (बहुधा एकापेक्षा जास्त). सकाळी अर्ध्या तासापेक्षा जास्त काळ कडकपणा राहतो आणि हालचालीने सांधे सैल होतात. अचानक सांधा सुजलेला (Acute mono-arthritis) रोगीही ऱ्हुमॅटॉलॉजिस्टकडे जायला हवा. ४५ पेक्षा कमी वयाच्या रोग्यामध्ये तीन महिन्यापेक्षा जास्त काल चालणारी कंबरदुखी ॲन्किलोसिंग स्पॉडिलायटिसमुळे असू शकते.
- लुपस, मायोसायटिस (स्नायूची सूज – दुखणे व दुर्बलता) इ. आजार (Connective tissue diseases)
- वेगवेगळ्या प्रकारची रक्तवाहिन्यांची सूज (Vasculitis)
- संधिवात (Osteoarthritis) तसेच मणक्यांचे स्पॉन्डिलोसिस
- हाडांचे विरळपणा (Osteoporosis) आणि इतर काही आजार
- गाउट, युरिक ॲसिड आणि अन्य स्फटिकजन्य संधिवात
- टेनिस एल्बो सारखे आजार (Soft Tissue Rheumatism)
- मुलांचे संधिवात (भारतात पेडियाट्रिक ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट बोटांवर मोजता येण्याइतकेच)
- वारंवार होणारे गर्भपात तसेच गर्भारपणातील ऱ्हुमॅटिक आजार
- याखेरीज निदान न झालेले एकापेक्षा जास्त शरीरयंत्रणांचे (Multisystem) आजार आणि अज्ञात कारणांमुळे येणारा ज्वर.

* M. D. (Med) ; Cell : 9822032373 ; E-mail : sywagh@yahoo.co.in

त्यामुळे अशा ठिकाणी संधिवाताच्या पेशंटना योग्य तो न्याय मिळू शकत नाही.

**ऱ्हुमॅटॉलॉजीची वैशिष्ट्ये**

ऱ्हुमॅटॉलॉजीत आजाराचा इतिहास आणि रुग्णपरीक्षा यांचे आधारे रोगनिदान करतात. त्या निदानाची निश्चिती करण्यासाठी नंतर इतर अत्यावश्यक तपासण्या केल्या जातात. गुडघ्याच्या संधिवातात एक्स रे, तरुण स्त्रियांमध्ये युरिक ॲसिड तसेच ए.एस.ओ., ए.एन.ए. अशा अनेक महागड्या चाचण्या ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट टाळू शकतात. मात्र अशा आजारांच्या बिनचूक निदानासाठी ऱ्हुमॅटॉलॉजिस्टच हवा. कॅनडातील एका सर्वेक्षणात असे लक्षात आले की ऱ्हुमॅटॉलॉजिस्टकडे इतर डॉक्टरांनी पाठवलेल्या रुग्णामध्ये ५०% वेळा रोगाचे निदानच केलेले नव्हते आणि उरलेल्या रुग्णांचे निदान ४०% वेळा अयोग्य होते. त्यामुळे अशा रोगांमध्ये निदानाची अनिश्चितता असताना ऱ्हुमॅटॉलॉजिस्टकडे गेलेले उत्तम. आजाराची क्रियाशीलता (Activity) आणि हानी (Damage) यांचे मोजमाप (Index) करुन ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट आजाराच्या गंभीरतेनुसार योग्य उपचार करु शकतात.

उपचारांनी आजार नियंत्रणात आला की औषधे कमी करणे, उपचार सुरु असताना आजार बळावला तर औषधयोजना बदलणे अशा गोष्टीही महत्त्वाच्या आहेत. ऱ्हुमॅटॉलॉजीतील बहुतेक औषधे ही कॅन्सरच्या औषधांसारखी धोकादायक असल्याने त्यांचा काळजीपूर्वक वापर करण्याचे तंत्र ऱ्हुमॅटॉलॉजिस्टकडे असते. संधिवातासाठी हल्ली अनेक नवी जैविक औषधे आली आहेत. ती औषधे महाग असली तरी योग्य अशा पेशंटमध्ये अक्षरश: जादूसारखा परिणाम दाखवतात.

ऱ्हुमॅटॉलॉजीत बहुतेक आजार प्रदीर्घ काळ चालणारे असतात. त्यात शरीरातील इतर कार्यप्रणालींचे दोष कालांतराने उद्‌भवत रहातात. कधी सांध्यांसाठी शस्त्रक्रिया लागते. रुग्णाचे मनोबलही टिकवणे महत्वाचे असते. मोठ्या रुग्णालयात त्या त्या सुपरस्पेशालिस्टची मदत घेऊन अशा वेळी ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट सूत्रधाराची भूमिका बजावत असतो.

ऱ्हुमॅटॉलॉजी ही वाटते तितकी खर्चिकही नाही. उलट ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट तज्ञ अचूक निदान आणि मोजक्या चाचण्या यांमुळे रुग्णाचा वेळ आणि पैसा वाचवू शकतात. लखनौच्या एका सर्वेक्षणात ए.एन.ए. ही महागडी रक्तचाचणी डॉक्टरांनी ९०% वेळा विनाकारण केली असे आढळून आले. योग्य वेळी केलेल्या अचूक निदानामुळे आजार लवकर नियंत्रणात येतो आणि भविष्यातला बराच खर्च वाचतो. मात्र यासाठी लवकरात लवकर ऱ्हुमॅटॉलॉजिस्टकडे जाणे आवश्यक आहे. कारण ऱ्हुमॅटॉइड संधिवातात पहिल्या तीन-चार महिन्यांतच सांध्यांची भरुन न येणारी हानी होते.

ऱ्हुमॅटॉलॉजीची मदत कोणत्या आजारात घ्यावी यासाठी अमेरिकन कॉलेज ऑफ ऱ्हुमॅटॉलॉजीने मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत.(www.rheumatology.org/publications/guidelines/refer). त्यानुसार ऱ्हुमॅटॉलॉजीतील आजारांची संक्षिप्त यादी येथे दिली आहे. (तक्ता पहा)विशेषत: सांध्यांना सूज तसेच कडकपणा येणारे रोगी त्वरेने ऱ्हुमॅटॉलॉजिस्टकडे जाणे अत्यावश्यक आहे.

**संधिवातासाठी अन्य वैद्यकीय तज्ञ**

ऱ्हुमॅटॉलॉजिस्टच्या कमतरतेमुळे तसेच या स्पेशालिटीची माहिती नसल्यामुळे संधिवाताचे बरेचसे रोगी ऑर्थोपेडिक सर्जनकडे जातात. नव्याने निदान झालेल्या संधिवातात योग्य औषधोपचारांमुळे शस्त्रक्रियांचे प्रमाण कमी होऊ शकते. रोचेस्टरमधल्या एका पहाणीनुसार १९८५ सालानंतर औषधी उपचारांच्या प्रगतीमुळे ऱ्हुमॅटॉइड संधिवातात सांधा बदलण्याच्या ऑपरेशनचे प्रमाण बरेच कमी झाले आहे. लुपस, सारकॉइड, कॅन्सरसारख्या आजारांच्या संधिवाताचे अचूक निदान सर्जनकडून सहसा अपेक्षित नसते. तसेच औषधांचा वापरही कित्येकदा काळजीपूर्वक केलेला दिसत नाही.

समाजात संधिवाताला असाध्य आणि दुर्धर आजार मानण्याची प्रवृत्ती दिसते. तसेच ॲलोपॅथिक औषधांच्या दुष्परिणामांची निरर्थक भीतीही आढळते. यामुळेच आयुर्वेद, होमिओपॅथी इत्यादी उपचारांकडे लोक वळतात. ऱ्हुमॅटॉलॉजीतील आजारांचे अचूक निदान अशा डॉक्टरांकडे होणे अवघड आहे. त्यामुळे रोग्याचा अमूल्य वेळ वाया जातो आणि सुजलेल्या सांध्यांचा नाश होतो. आयुर्वेदिक औषधे तसेच त्यातले पंचकर्मादि उपचार हल्ली स्वस्तही राहिले नाहीत. सुजेच्या संधिवातात उपयोगी पडेल अशा कोणत्याही आयुर्वेदिक अथवा होमिओपॅथिक औषधाविषयीचे संशोधन आतापर्यंत सर्वमान्य जागतिक नियतकालिकात प्रकाशित झालेले नाही.

◆ ◆